PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhaucha Dhakka
Year: 2011

Song: Patach Vahnar Zulzul Pani
Lyricist:

पाटाचं वाहणारं झुळझुळ पाणी
बैलाच्या घुंगराची मंजुळ वाणी
हो...पाटाचं वाहणारं झुळझुळ पाणी
बैलाच्या घुंगराची मंजुळ वाणी
पक्षांची शाळा भरते उंच आभाळी
काळ्या मातीचा गंध मनाला भुलवी
मी आलो माझ्या गावी
मी आलो माझ्या गावी
चला चला सयांनो बिगीबिगी
धनी थांबलाया शेतामंदी
ऊन आलंया डोक्यावरी
येळ झाली जेवाची
भुकेला हाय माझा धनी
त्याला भरवू भाकरी
चलाचला सयांनो बिगीबिगी
चलाचला सयांनो बिगीबिगी

डोंगर दऱ्यातून वाट जाते कुठे
ऊन सावलीच्या खेळात कोण जिंकते
हो...डोंगर दऱ्यातून वाट जाते कुठे
ऊन सावलीच्या खेळात कोण जिंकते

या सप्तरंगी इंद्रधनुला
कुणी का व कसे रंगविले
मावळत्या सूर्याला पाहताना
कर माझे का जुळते
जुळते जुळते
पाटाचं वाहणारं झुळझुळ पाणी
बैलाच्या घुंगराची मंजुळ वाणी
पक्षांची शाळा भरते उंच आभाळी
काळ्या मातीचा गंध मनाला भुलवी
मी आलो माझ्या गावी
मी आलो माझ्या गावी
मी आलो माझ्या गावी
मी आलो माझ्या गावी
चला चला सयांनो बिगीबिगी
चला चला सयांनो बिगीबिगी
दिस उलटून गं सांज झाली
येळ झाली घरा कडली
घरट्याकडं परतलं हाय पक्षी
गुरंढोरं गोठया मंदी
चला चला सयांनो बिगीबिगी
चला चला सयांनो बिगीबिगी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*